# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.07.2024** **वारः मंगळवार**

---

- राज्यात सर्वदूर पावसाची दमदार हजेरी, मुंबई, कोकणात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत
- सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- पुणे, मुंबईसह विविध जिल्ह्यात आजही मुसळधार पावसाचा इशारा; शाळांना सुटी जाहीर
- नीट युजी पेपरफुटी प्रकरणी अहवाल सादर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेला निर्देश
- पुणे विमानतळावरचं नवं टर्मिनल येत्या रविवारपासून कार्यान्वित होणार – केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

**पाऊस**

मोसमी पावसाने काल मुंबई, कोकणसह राज्यात सर्वदूर दमदार हजेरी लावली. मुंबई महानगर क्षेत्रात रविवारी मध्यरात्रीपासून झालेल्या पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई महापालिकेच्या आकडेवारीनुसार मुंबईच्या पूर्व उपनगरात काही ठिकाणी रविवारी मध्यरात्री १ वाजल्यापासून काल सकाळी ७ पर्यंत सुमारे ३०० मिलीमीटर पाऊस झाला.

या पावसानं उपनगरी रेल्वे सेवा विस्कळीत झाली होती. पुणे आणि नाशिकहून मुंबईकडे जाणाऱ्या अनेक रेल्वे गाड्याही काल रद्द करण्यात आल्या. मुंबईतल्या रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचल्यानं मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

रविवारी मध्यरात्री पासूनच जोरदार पाऊस असल्यानं पालिकेनं मुंबईतल्या शाळांना सुटी जाहीर केली होती. राज्य सरकारनं कार्यालयं लवकर सोडण्याचे आदेश काल दुपारी जारी केले.

मुसळधार पावसामुळे विधिमंडळ अधिवेशनासाठी आमदार वेळेत पोहोचू न शकल्यानं दोन्ही सभागृहांचं कामकाज आधी एकदा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार निरंजन डावखरे आणि जगन्नाथ अभ्यंकर यांनी काल विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली.

पावसामुळे राज्यातलं, विशेषतः मुंबईचं जनजीवन विस्कळीत होण्याला सरकार जबाबदार असल्याची टीका विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. तर, मुंबईतल्या यंदाच्या नालेसफाई प्रकरणी श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी आमदार आशिष शेलार यांनी केली.

कोकणातही सर्वत्र काल मुसळधार पाऊस पडला. रायगड जिल्ह्यातील सर्वच नद्यांना पूर आले असून जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुसळधार पावसामुळे रायगड किल्ल्याच्या पायऱ्यांवरून पाण्याचा जोरदार प्रवाह वाहू लागल्याने काही पर्यटक अडकले होते, जिल्हा प्रशासनाने त्यांची सुटका केली. जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे कालपासून रायगड किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे. रोह्यात कुंडलिका नदीला पूर आल्याने जुना पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेले तीन-चार दिवस मुसळधार पाऊस झाला; काल पावसाचा जोर काहीसा कमी झाला होता. राज्य परिवहन मंडळाच्या रत्नागिरी जिल्ह्यातल्या सर्व आगारांमधल्या एकंदर ४०५ बसफेऱ्या काल रद्द करण्यात आल्या

कोल्हापूर जिल्ह्यात धरण क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. जिल्ह्यातील अनेक धरण पूर्ण क्षमतेने भरली असून, राधानगरी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर ठाणे, वसई, महाड, चिपळूण, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सिंधुदुर्ग इथं एनडीआरएफची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

पुणे शहर तसंच जिल्ह्याच्या विविध भागातही काल संध्याकाळनंतर पावसानं दमदार हजेरी लावली. गेल्या तीन चार दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळं खडकवासला धरण प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे.

अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या अकोला जिल्ह्यातही पावसाने काल जोरदार हजेरी लावली; त्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचं वातावरण आहे. शहरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात शनिवारपासून पावसाची संततधार सुरू असल्याने अनेक जलप्रकल्प भरले आहेत. खामगाव तालुक्यात मुसळधार पावसामुळे शेतपिकाचं नुकसान झालं आहे. अनेक गावांमध्ये पुराचं पाणी शिरल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मंत्रालयातल्या आपत्ती व्यवस्थापन कक्षातून आढावा घेतला. नागरिकांना आवश्यक मदत देण्याला सर्वोच्च प्राधान्य असून सर्व यंत्रणांना २४ तास सतर्क राहण्याचे आदेश दिल्याचं शिंदे यांनी बैठकीनंतर मध्यमांशी बोलताना सांगितलं.

दरम्यान आजही राज्यातल्या काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे; कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुणे शहर आणि जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, आणि रायगड जिल्ह्यातील शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

**SB - ड्रंकअँडड्राईव्ह- मुख्यमंत्री**

मद्यपान करून वाहन चालवण्याची प्रकरणं रोखण्यासाठी कडक कारवाई करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. वर्दळीच्या ठिकाणी तसंच नाक्या-नाक्यांवर वाहनचालकांची तपासणी करून या प्रकरणी कडक कारवाई करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी मुंबईच्या पोलीस आयुक्तांना दिल्या. या संदर्भात काल माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले

**<u>हीटअँडरन</u>**

पुण्यात रविवारी रात्री झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन पोलिस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला तर एक पोलिस कर्मचारी जखमी झाले. दुचाकीवरुन निघालेल्या पोलिसांना पाठीमागून आलेल्या वाहनाने धडक दिल्याने हे दोन्ही अपघात झाले.

**<u>नीट</u>**

नीट युजी पेपरफुटी प्रकरणी आतापर्यंत काय पावलं उचलली याची माहिती देणारी प्रतिज्ञापत्रं उद्या संध्याकाळपर्यंत न्यायालयात सादर करावीत असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेला दिले. तसंच या प्रकरणाच्या तपासाचा सद्यस्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला दिले आहेत. नीटची फेरपरीक्षा घ्यावी अशी मागणी करणाऱ्या याचिकेसह विविध ३८ याचिकांवर काल सुनावणी झाली. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या गुरुवारी होणार आहे.

दरम्यान 'नीट' परीक्षा गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी संजय जाधवला काल १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. जाधव याच्या सीबीआय कोठडीची मुदत संपल्यामुळे त्याला काल लातूर न्यायालयासमोर हजर करण्यात आलं होतं.

**<u>नवीन टर्मिनल पुणे</u>**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरचं नवं टर्मिनल, येत्या रविवारी म्हणजेच १४ जुलै रोजी सुरू होईल, अशी माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल दिली. हे नवं टर्मिनल सुरू  करण्यासाठी सीआयएसएफच्या अतिरिक्त जवानांची आवश्यकता होती. त्याला परवानगी मिळून सीआयएसएफचे जवान पुणे विमानतळावर दाखल झाले आहेत. त्यानंतर आता तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होत असून नवं टर्मिनल सुरु झाल्यानंतर पुणेकर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असल्याचं मोहोळ यांनी म्हटलं आहे.

**<u>धावपट्टी</u>**

दरम्यान पुण्यातल्या लोहगाव विमानतळावरच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या ओ एल एस सर्वेक्षणालाही सुरुवात झाली आहे. दिल्लीहून आलेल्या विशेष तज्ज्ञांच्या पथकाकडून हे सर्वेक्षण केलं जात आहे.

**<u>निवडणूक</u>**

आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगानं काल राज्यात आढावा बैठक घेतली. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई, ठाणे, पालघरचे महानगर पालिका आयुक्त, पोलिस आयुक्त आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकारी या बैठकीत दूरस्थ माध्यमातून सहभागी झाले होते. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी उंच इमारतीमध्ये तसंच 200 पेक्षा जास्त घरं असलेल्या सहकारी सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र उभरण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना यावेळी सूचना देण्यात आल्या.

**राष्ट्रवादी**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनतेकडून देणगी स्वीकारण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाने केलेली मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाने मान्य केली आहे. पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल निवडणूक आयोगाची भेट घेतली. त्यानंतर त्या बोलत होत्या.

**आषाढी पालखी**

संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा अडीच दिवसांचा मुक्काम संपवून काल तरडगाव मुक्कामी मार्गस्थ झाला. वाटेत, लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत काल चांदोबाचा लिंब परिसरात उभं गोल रिंगण पार पडलं.

**शहीद अंत्यसंस्कार**

अकोला जिल्ह्याचे सुपुत्र हुतात्मा प्रवीण जंजाळ यांच्या पार्थिव देहावर मोरगाव भाकरे या त्यांच्या मूळ गावी काल लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्याबरोबर झालेल्या चकमकीत प्रवीण जंजाळ यांना वीरमरण आलं होतं.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.